# अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन..

17.09.2019 कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागातर्फे अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून क. बा.चौ.उ. म. वि. जळगांव मानव्यविद्याशाखा अधिष्ठाता व धनदाई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद पवार हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य अरविद चौधरी होते प्रास्ताविक प्रा. डी. एस. पाटील सर यांनी तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉक्टर मधुकर खराटे सर यांनी करून दिला... दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले त्यानंतरप्राचार्य डॉ. प्रमोद पवार यांनी आपल्या मार्गदर्शना मध्ये जागतिक तसेच भारतीय अर्थव्यवस्था यांची सद्यस्थिती, भारतीय ग्रामीण कृषी अर्थव्यवस्था, व कृषीमध्ये तंत्रज्ञानाचा योग्य पद्धतीने वापर केला तर आपण आर्थिक समृद्धता साध्य करू शकतो. यासोबतच या स्पर्धेच्या युगामध्ये व्यक्तिमत्व विकास, तंत्रज्ञान वापराचे कौशल्य व वेगवेगळ्या कला गुणांमध्ये नैपुण्य मिळवल्यास यातून आपण रोजगाराच्या संधी निर्माण करू शकतो असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी सर यांनी आपल्या मनोगतामध्ये मंदीकडे संधी म्हणून पाहणे आवश्यक असून तरुणांनी नोकरीच्या पाठीमागे न धावता रोजगाराकडे वळणे आवश्यक आहे. यासोबतच बँकांचे पतधोरण, शेअर मार्केट, मुद्रा लोन, संगणक साक्षरता यांचे महत्त्व अधोरेखित करून राजकीय परिदृश्य व आर्थिक घडामोडी या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे प्रतिपादन केले. सदरील कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील डॉ. सुधाकर काठोके, डॉ.प्रभाकर महाले, डॉ. पी. एन. पाटील, प्रा. अजय पाटील, डॉ. मनोज निकाळजे, डॉ. व्ही. पी.चौधरी यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोशनी बहादुर व प्रतिक्षा मस्के या विद्यार्थिनींनी केले तर आभार अर्थशास्त्र विभाग प्रमुख श्रीमती हेमलता कोटेचा यांनी मानले








